Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - IV APRIL 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# समाजकार्यात डॉ. नानासाहेब जाधव याचे योगदान

**प्रमोद विक्रम राठोड**
संशोधन केंद्र :- जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय.
सिडको, नवीन नादेंड

**प्रस्तावना :-**

**डॉ.** नानासाहेब जाधव यांनी समाजकार्याला खऱ्या अर्थाने विद्यार्थीदशतच सुरूवात केली होती. असे म्हणटले तर अतिशोक्ती होणार नाही. परंतु त्यांना कदाचीत माहीत असावे की, समाजकार्यासाठी अथवा समाज सुधारण्यासाठी स्वतः पहीले शिक्षण घेतले पाहीजे. म्हणून त्यांनी स्वतःला पहिले उच्चशिक्षत केले आणि नंतर समाज कार्यामध्ये स्वतःला झुकून दिले. डॉ. नानासाहेब जाधव यांच्यावर तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या विचाराचा पगडा मोठा जाणवतो. त्यांच्या मते, 'असे शिक्षण कोणत्याच कामाचे नाही ज्यामुळे समाजासाठी त्याचा उपयोग होत नाही'. या वाक्यामुळे डॉ. नानासाहेब जाधव प्रभावित झाले. आणि आपला समाज शिकला पाहीजे, समाजातील अंधकार व समाज अज्ञानातून बाहेर पडला पाहीजे, त्याच्यावर आलेली हालाक्याची परिस्थिती, जीवन जगण्याची परिस्थिती बदलली पाहीजे, आणि हे शिक्षणाशिवाय अशक्य आहे. हे लक्षात घेऊन डॉ. नानासाहेब जाधव झपाटून कामाला लागले. २० ते २२ तांडयांना पायी फिरून स्वतः भेट दिली. त्या गावातील लोकांना भेटले, शिक्षणाचे महत्व पटवून दिले. आणि प्रत्येक तांडयातील मुले शाळेत आणली.यातून डॉ. नानासाहेब जाधव यांच्या समाज कार्याची मुर्हुतमेढ रोवली गेली. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा लोकसभा सदस्य (नांदेड) आशोकराव चव्हाण यांनी मांडलेली मत, "डॉ. नानासाहेब जाधव यांनी ग्रामीण जीवन पध्दती अतिशय जवळून अनुभवलेली असल्याने त्यांनी सर्वप्रथम स्वतःला उच्चशिक्षित व सुसंस्कृत करून या भागातील युवकांच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षणाची फार मोठी सोय उपलब्ध करून दिली. या भागाच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील विकासाबाबत नेहमीच त्यांची भूमिका सकारात्मक व दिशादर्शक ठरली आहे. त्याचे या क्षेत्रातील योगदान लाख मोलाचे आहे."[१] महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाडयातील गोर-गरिबांच्या सर्वांगिन विकासासाठी महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या डॉ नानासाहेब जाधव यांनी आगदी विद्यार्थीदशेपासून समाजाच्या बांधीलकीची जाण ठेवून विविध समाज विकास उपकृमामध्ये हिरीरीने भाग घेत समाज विकासातील आडचणी राज्यकर्त्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी सनदशीर मार्गाने त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आणि त्यासाठी वेळोवेळी जनआंदोलनेही उभी केली आहेत. या जरनलच्या माध्यमातून त्यांचे समाजविकासातील योगदानाची ओळख करून देण्याचा हा एक प्रयत्न आहे.

**जीवन परिचय :-**

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच समाजिक कार्यात आपली छाप उमठविणाऱ्या कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव यांचा जन्म १ जानेवारी १९५६ रोजी झाला. त्यांच्या जन्माच्या वेळी त्याच्या आई-वडिलांची परिस्थिती फारच हालाख्याची होती. वडिलाचा मेंढपाळाचा व्यवसाय असल्यामुळे त्यांना सतत या खेडयावरून त्या खेडयावर भटकंती करावी लागत होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत डॉ. नानासाहेबांना त्याचे वडिल रामकिशनरावांनी शाळेत घातले. डॉ नानासाहेब जाधव यांचे प्राथमिकशिक्षण पहिली व दूसरी एका खाजगी शिक्षकाद्वारे दिग्रस खुर्द या राहत्या तांडयातच झाले. इयत्ता तिसरीचे शिक्षण कोटग्याळ ता. मुखेड जि. नांदेड येथील श्री. किशनराव राठोड यांनी काढलेल्या प्राथमिक शाळेत झाले. १९५६ मध्ये श्री रामराव राठोड यांच्या संस्थेची प्राथमिक शाळा श्री नाईक विद्यामंदिर दिग्रस खुर्द येथे सुरू झाली. याच शाळेत सन १९६५ ला इयत्ता चौथी मध्ये डॉ. नानासाहेब जाधव यांनी प्रवेश घेतला. श्री नाईक विद्यामंदिराला पूढे माध्यमिक वर्ग जोडण्यात आले. सन १९६५ ते १९७२ या कालावधीतपर्यंतचे शिक्षण इयत्ता चौथी ते दहावी त्यांनी याच शाळेत पूर्ण केले.[२] सन १९७२ मध्ये पी.यु.सी (विज्ञान) यशवंत महाविद्यालय नांदेड येथे पूर्ण केले. सन १९७३ ला याच महाविद्यालयात बी. एससी. प्रथम वर्गात प्रवेश घेतला. डॉ. नानासाहेब जाधव यांना वैधकीय शिक्षण घेऊन डॉक्टर होण्याची इच्छा होती. याच काळामध्ये श्री नाईक विद्यालयाच्या असलेल्या जबाबदारीत वाढझाल्याने डॉ. नानासाहेब जाधव यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ लागले. पुढील काळात त्यांनी उदगीर येथील उदयगिरी महाविद्यालयामध्ये बी.ए. पदवीचे शिक्षण पूर्ण केले. नंतरच्या काळात जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यलय सिडको नवीन नांदेड येथून एम.एस.डब्ल्यू. पदव्युत्तर कोर्स पूर्ण केला. पुढे याच समाजकार्य महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून सन १९९५ पासून ते कार्यरत राहीले. पुढे या महाविद्यालयामध्ये

प्रभारी प्राचार्य म्हणून जवळ जवळ १४ वर्षे ते काम पाहिले. एकंदर या सर्व कार्यामूळे ते पुढे संशोधनाकडे वळले. संस्थेचा प्रचंड व्याप असातानाही शेवटी इ.स. २०१२ मध्ये शिक्षणातील सर्वोच्च पदवी पी.एचडी. त्यांनी मिळविली. वैद्यकिय डॉक्टर होण्याची अपूर्ण राहिलेली इच्छा सामाजिक डॉक्टर होऊन पूर्ण केली. आज त्यांच्या कार्याचे क्षेत्र वाढले असून ते 'श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेच्या संचालक पदावर कार्यरत आहेत.

**शैक्षणिक कार्यातून समाज कार्याकडे वाटचाल :-**

खेडयापाडयातील विशेषतः गोर गरिबांच्या मुलामुलींना शिक्षणाची सोय व्हावी त्यांचे भविष्य सुधारावे, त्यांचा सर्वांगिन विकास व्हावा आणि स्वप्न साकार करण्यास प्रेरणा मिळावी. ही उदिष्टय डोळयासमोर ठेवून डॉ. नानासाहेब जाधव यांनी १६७० साली स्वतःच्या नेतृत्वाखाली गांधीनगर येथे श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ' या सेवाभावी शिक्षणसंस्थेची स्थापना केली. आणि येथूनच त्यांच्या समाज कार्याला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. याच काळात तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईकमहाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी होते आणि राज्यातील भटक्या विमुक्तांच्या मुलांमुलींना शिक्षण देण्यासाठी दुर्गम व ग्रामीण भागात आश्रमशाळा सुरू करण्याचा उपक्रम त्यांनी हाती घेतला होता. या उपक्रमाने डॉ. नानासाहेब जाधव भारावून गेले आणि त्यांनी आपल्या मुळगावी गांधीनगर येथे आश्रमशाळा सुरू करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केला. त्यांच्या या प्रस्तावास शासनाने १६७७ साली मान्यता दिली आणि याच वर्षी गांधीनगर या लहानशा गावात प्राथमिक आश्रमशाळा सुरू झाली. आणि डॉ. नानासाहेब जाधव यांच्या समाज कार्याला सुरूवात झाली. विशेषतः म्हणजे डॉ. नानासाहेब जाधव यांना माहित होते. समाज कार्यासाठी शिक्षण किती महत्वाचे आहे. हे त्यांना माहित होते. म्हणून त्यांनी समाज कार्यासाठी शैक्षणिक क्षेत्राला हाताशी धरून आपली समाजकार्याची वाटचाल सुरू केली आज त्यांच्या संस्थे मार्फत जवळ-जवळ ४१ युनिट चालत असून या युनिट मधून शिक्षणासोबत अनेक सामाजिक विकासाचे उपकृमही राबविली जातात. आणि याचे संपूर्ण श्रेय डॉ. नानासाहेब जाधव यांना जाते.

**डॉ. नानासाहेब जाधव यांचे समाज कार्यातील योगदान :-**

डॉ. नानासाहेब जाधव महाविद्यालयीन दशेपासूनच आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरिक्षण करत होते. आणि त्यांना सतत वाटत असतं की, आपल्या समाजाचा विकास झाला पाहिजे, माझा समाज प्रगतिपथावर गेला पाहीजे, ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकला पाहीजे, या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहीजे, ते नेहमी आपल्या व्याख्यानातून बोलत असतांना म्हणतात. शिक्षण हे विकासाचे टॉनिक आहे जो. प्राशन करील तो विकसित झाल्याशिवाय राहणार नाही.[४] त्यांच्या समाज कार्याची नोंद खालील मुध्यांच्या आधारे करता येईल.

१) डॉ.नानासाहेब जाधव यांच्या सामाजिक कार्याला विद्यार्थीदशेतच सुरूवात झालेली दिसून येते. इ.स. १९७४–७५ साली मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मात्र १७ रू प्रतिमाह शिष्यवृत्ती मिळायची ही शिष्यवृत्ती वाढविण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊन तत्कालिन मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक व त्यावेळी राज्याचे पाठबंधारे मंत्री असणारे शंकरराव चव्हाण नांदेड दौऱ्यावर आले होते. ही संधी साधून सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांचा मोर्चा घेवून डॉ. नानासाहेब जाधव मुख्यमंत्री व पाठबंधारे मंत्र्यास भेटले.[५] आणि शिष्यवृत्तीचा प्रश्न निकाली काढला.

२) इ.स. १९८१–८२ साली वसंतदादा पाटील राज्याचे मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र राज्य वि.जा.भ.ज. कल्याण समितीवर डॉ. नानासाहेब जाधव सदस्य म्हणून घेण्यात आले होते. त्यावेळी वसंतदादा व तत्कालीन समाजकल्याण मंत्री प्रतिभा पाटील यांच्या सोबत झालेल्या बैढकीत विमुक्त व भटक्या जमातीची अर्थिक उन्नती करण्यासाठी स्वतंत्र अर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी मागणी केली होती. त्यांची ही मागणी सरकार विनाविलंब मान्य केली.

३) खाजगीकरण, जागतिकरण आणि उदारीकरण धोरणामुळे श्रीमंत अती श्रीमंत होत आहे तर गरीब अति गरिब होताना दिसून येत आहे. अशा परिस्थितीत तळागाळातील सामाजिक व आर्थीक दुर्बल मागास घटकांच्या उन्नतीसाठी प्रगतीसाठी सतत लढणारे व्यक्तीमत्त्व म्हणून डॉ. नानासाहेब जाधव यांचा उल्लेख होताना दिसून येतो.

४) आज डॉ. नानासाहेब जाधव यांच्या सहकार्यामुळे नांदेड जिल्हातील भटक्या विमुक्त जाती, जमातीचे विद्यार्थी शासकीय व खाजगी क्षेत्रामध्ये विविध पदावर नोकरी करित आहेत.

५) डॉ. नानासाहेब जाधव यांनी केलेल्या समाजकार्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये इ.स. १९९५ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'दलितमित्र संस्था पुरस्कार' महाराष्ट्र राज्य मुंबई, एकता गौरव पुरस्कार २००४, समाज सेवा रत्न पुरस्कार, २००४ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'दलित मित्र' पुरस्कार महाराष्ट्र राज्य मुंबई २०१० इत्यादी.

**समारोप :-**

डॉ. नानासाहेब जाधव यांच्या कादकिर्दीचे सुक्ष्म परिक्षण केल्यास असे दिसून येते की, सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ

या संस्थेची कामे करित असताना त्यांनी समाज जीवण व सामाजातील वंचित, शोषित घटकांशी आपली नाळ कायम जोडून ठेवली. आणि हे एक डॉ. नानासाहेब जाधव यांचे विलक्षण असे वैशिष्टय दिसून येते. त्याच्या व्यक्तीमत्त्वाचा अभ्यास करित असताना दिसून येते की, सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रत्येक युनिटच्या निर्मीतीमागे समाजातील विशिष्ठ गरजू घटकाला त्यांनी डोळयापूढे ठेवून त्यांच्या विकासाचा उदात्त हेतू बाळगल्याचे दिसून येते. जसे की, समाजातील वंचित व दुर्लभित अंपगासाठी, निराधारासाठी, गरीब मागासवर्गीयांसाठी त्यांनी उभी केलेले वसतिगृहे, आश्रमशाळा इत्यादी कार्याचा मुळ आधार समाजकारण आहे. त्याचबरोबर केंद्रबिंदू हा गरीब वंचित, निराश्रित, मागासवर्गीय घटक राहिलेला आहे.

वरिल विवेचनावरून असे स्पष्ट होते की, डॉ नानासाहेब जाधव हे आपल्या कारकिर्दीमध्ये समाजकारणाशी आपली नाळ कायम जोडून ठेवली आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) 'कर्मयोगी' डॉ. नानासाहेब जाधव 'गौरव अंक' संपादक प्रा. श्रीनिवास जाधव २०१४ पेज नं. १
२) कित्ता, पेज नं. ११
३) 'ज्ञानदीप' वार्षिक अहवाल व वार्षिकांक २००६-०७ संपादक प्राचार्य एस.व्ही. घूले.
४) ५) 'कर्मयोगी' डॉ. नानासाहेब जाधव 'गौरव अंक' संपादक प्रा.श्रीनिवास जाधव २०१४पेज नं. ५८
५) 'ज्ञानदीप' वार्षिक अहवाल व वार्षिकांक २००६-०७ संपादक प्राचार्य एस.व्ही. घूले.